# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
# परभणी

## परिपत्रक

जा.क्र.२०२०/परिपत्रक/प्र.क्र.-६/आस्था-८

दिनांक : २४/१२/२०२०

विद्यापीठात शैक्षणिक /संशोधन/विस्तार कार्यात्मक दृष्टया विकासाच्या मार्गावर असतांना विद्यापीठाच्या नावे बनावट नियुक्ती आदेश,बदली आदेश व इतर बनावट कागदपत्रे तयार करुन तसेच विविध कार्यालयातील कार्यालय प्रमुखांच्या बनावट स्वाक्षरीने रुजू अहवाल, कार्यमुक्त अहवाल व कागदपत्रे तयार करुन फसवणूक केल्याचे प्रकार घडत आहेत. त्यामुळे विद्यापीठाची जनमानसात प्रतिमा मलीन झालेली आहे.

वस्तुतः विद्यापीठात जाहीरात प्रकाशित केल्यानंतर परीक्षाअंती गुणवत्तेच्या अधारे व निवड समितीच्या शिफारशीनुसार भरती प्रक्रिया करण्यात येते. त्यामुळे अशा फसवेगिरीला संदिग्ध गतीविधीला आळा घालण्यासाठी विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी खास करुन सर्व कार्यालय प्रमुख यांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. विद्यापीठांतर्गत प्रशासकीय कार्यालयाकडून /इतर कार्यालयाकडून होणारा पत्र व्यवहार व त्यावरील संबधीत अधिकारी यांची स्वाक्षरी /कार्यालयीन क्रमांक किंवा इतर बाबतीत शंका उपस्थित झाल्यास त्वरीत कुलसचिव कार्यालयाकडे /संबधीत कार्यालयाकडे चौकशी करुनच पुढील कार्यवाही करावी.

जर विद्यापीठांतर्गत सेवा विषयक पत्रव्यवहार संदिग्ध असल्याची शंका उपस्थित होऊनही वरीष्ठ कार्यालयाकडे / संबधीत कार्यालयाकडे चौकशी न करता /त्याची पडताळणी न करता कार्यवाही केल्यास अशी गतीविधी ही म.ना.से.( वर्तणूक ) नियम १९७९ नुसार गैरवर्तन मानल्या जाईल याची नोंद घ्यावी.

कुलगुरु यांच्या मान्यतेने,

स्थळप्रतिवर कुलसचिव यांची स्वाक्षरी

कुलसचिव करिता

पु.कों.काळे,उपकुलसचिव (आस्था)